# कच्च्या पाण्याची अनुपलब्धता, वादळी वारे, वीजपुरवठ्यातील खंड व प्रलंबित पाऊस यांमुळे शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत

### #एप्रिल व मे महिन्यांत पाणीपुरवठा राहिला बाधित

### #पाऊस येईपर्यंत परिस्थिती राहणार जैसे थे

**नागपूर, ८ जून २०१९**: शहराच्या पाणीपुरवठ्यापुढे अनेक आव्हाने उभी आहेत ज्यामुळे मनपाला पाणीपुरवठा व्यवस्था सांभाळणे कठीण होत आहे. या परिस्थितीला कारणीभूत बाबींमध्ये मुख्यत: कच्च्या पाण्याची अनुपलब्धता, वादळी वारे, वीजपुरवठ्यात वारंवार होणारा खंड आणि पावसाला होत असलेला उशीर या बाबींचा समावेश आहे. या कारणांमुळेशहराचा पाणीपुरवठा एप्रिल व मे महिन्यांत अनेक दिवस विस्कळीत राहिला. पाऊस येईपर्यंत ही परिस्थिती सुधारण्याची अपेक्षा करता येणार नाही.

येथे उल्लेखनीय आहे कि, मागील वर्षी झालेल्या अपुऱ्या पावसामुळे यावर्षीची कच्च्या पाण्याची स्थिती गेल्या अनेक वर्षांतील सर्वात कमी राहिली आहे. यामुळे तोतलाडोह जलाशयातील 'मृत साठा'देखील शहराची पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी यावर्षी उपयोगात आणावा लागला.

त्याचबरोबर नवेगाव खैरी व कन्हान येथे MSEBकडून संपूर्ण महिन्यात अनेकदा व गेल्या आठवड्यात दररोज वीजपुरवठा खंडित राहिला. यामुळे पेंच १, २, ३ आणि पेंच ४ येथे पंपिंगसाठी पुरेसे पाणी उपलब्ध होऊ शकले नाही. या सर्व घटनांमध्ये MSEB कडून पूर्ण पाठिंबा राहिला असला तरी या सतत खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शहराच्या पाणीपुरवठ्यावर गंभीर परिणाम झालेला आहे.

अर्ध्याहून अधिक शहराचा विस्कळीत झालेला असून बाधित भागांना टँकरद्वारे पाणीपुरवठादेखील शक्य होत नाही. नैसर्गिक कारणांमुळे उद्भवलेली ही परिस्थिती कुणाच्याही नियंत्रणात नाही. मात्र,

मनपा-OCW परिस्थिती सांभाळण्यासाठी प्रयत्नांची शर्थ करीत आहेत. ही बाब स्पष्ट आहे कि, पाउस येऊन जलाशयांमधील पाणी पुरेसे झाल्याशिवाय परिस्थिती सुरळीत होऊ शकणार नाही.

मनपा अधिकाऱ्यांनी नागरिकांना सहकार्याचे आवाहन केले असून पुरेसा पाणीसाठा करून ठेवण्याची विनंती केली आहे.